सब सुख लहै तुम्हारी सरना । तुम रच्छक काहू को डर ना ।।
आपन तेज सम्हारे आपै । तीनों लोक हाँक तें काँपै ।।
भुत पिसाच निकट नहिं आवै । महाबीर जब नाम सुनावैं ।।
नासै रोग हरै सब पीरा । जपत निरंतर हनुमत बीरा ।।
संकट ते हनुमान छुडावै । मन क्रम बचन ध्यान जो लावै ।।
सब पर राम तपस्वी राजा । तिन के काज सकल तुम साजा ।।
और मनोरथ जो कोई लावै । सोइ अभित जीवन फल पावै ।।
चारों जुग परताप तुम्हारा । है परसिद्ध जगत उजियारा ।।
साधु संत ते तुम रखवारे । असुर निकंदन राम दुलारे ।।
अष्ट सिद्धी नौ निधि के दाता । अस बर दीन जानकी माता ।।
राम रसायन तुम्हरे पासा । सदा रहो रघुपति के दासा ।।
तुम्हरे भजन राम को पावै । जनम जनम के दुख विसरावै ।।
अंत काल रघुबर पुर जाई । जहाँ जन्म हरि भक्त कहाई ।।
और देवता चित्त न धरई । हनुमत सेइ सर्ब सुख करई ।।
संकट कटै मिटै सब पीरा । जो सुमिरै हनुमत बलबीरा ।।
जै जै जै हनुमान गोसाई । कृपा करहु गुरु देव की नाई ।।
जो सत बार पाठ कर कोई । छुटहि बंदि महा सुख होई ।।
जो यह पढै हनुमान चलीसा । होय सिद्धि साखी गौरीसा ।।
तुलसीदास सदा हरि चेरा । कीजै नाथ हृदय महँ डेरा ।।
पवनतनय संकट हरन, मंगल मुरति रूप । राम लखन सीता सहीत,
हृदय बसहु सुर भुप ।।





## नव ग्रह स्तोत्र

जपाकुसुमसंकाशं काश्यपेयं महद्युतिम् ।
तमोऽरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम् ।।१।।
दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णवसंभवम् ।
नमामि शशिनं सोमं शम्भोर्मुकुटभूषणम् ।।२।।
धरणीगर्भसंभूतं विद्युतकान्तिसमप्रभम् ।
कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम् ।।३।।
प्रियंगकलिकाश्यामं रुपेणाप्रतिमं बुधम् ।
सौम्यं सोम्य गुणोपेतं तं बुंध प्रणमाम्यहम् ।।४।।
देवानां च ऋषीणां च गुरुं कांचनसन्निभम् ।
बुध्दिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पितिम् ।।५।।
हिमकुन्दमृणालाभं दैत्यानां परमं गुरुम् ।
सर्वशास्त्रप्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम् ।।६।।
नीलांजनसमाभासं रविपुत्रं यमाग्रजम् ।
छायामार्तण्डसंभुतं तं नमामि शनैश्चरम् ।।७।।
अर्धकायं महाविर्यं चंद्रादित्यविमर्दनम् ।
सिंहितागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम् ।।८।।
पलाशपुष्पसंकाशं तारकाग्रहमस्तकम् ।
रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतूं प्रणमाम्यहम् ।।९।।
इति व्यासमुखोद्गीता यः पठेत्सुसमाहितः ।
दिवा वा यदि वा रात्रौ विघ्नशांतिर्भविष्यति ।।१०।।
नरनारीनृपाणां च भवेतदुःस्वप्ननाशनम् ।
ऐश्वर्यमतुलं तेषामारोग्यं पुष्टिवर्धनम् ।।११।।
ग्रहनक्षत्रजाः पीडास्तस्कराग्निसमुद्भवाः ।
ताः सर्वाः प्रशमं यान्ति व्यासोब्रुते न संशयः ।।१२।।
इति श्री व्यासविरचितं नवग्रहस्तोत्रं संपुर्णम् ।।

## शिवलिलामृत अध्याय वाचनाने मिळणारी फलश्रृती

**अध्याय १** या अध्यायाचे नित्यवाचन केले, तर संचित पापे नाहीशी होऊ शकतात.

**अध्याय २** सोमवारी सायंकाळी वाचन केले,तर आपल्या हातुन नकळत घडलेले पाप नाहीसे होते.

**अध्याय ३** रात्रीच्या प्रथम प्रहरी अध्याय वाचला, तर भूतबाधा नाहीशी होऊ शकते.

**अध्याय ४** सोमवारी मोठ्याने वाचन करावे.त्यामुळे दारीद्रय नष्ट होऊन शत्रुभय नष्ट होते.

**अध्याय ५** याचे वाचन करुन प्रदोष व्रत करावे. संकटे नाश पावतात. गेलेले वैभव पुन्हा प्राप्त होते.

**अध्याय ६** स्त्रियांनी हा अध्याय वाचला, तर सौभाग्य टिकते व सर्वजण दीर्घायुषी होतात.

**अध्याय ७** दर सोमवारी या अध्यायाचे परम श्रद्धेने वाचन करावे. त्यामुळे आपला कपटी स्वभाव बदलण्यास उपयोग होईल. सद्‌गुरुची भेट घडु शकेल.





**अध्याय ८** जीवनात यश प्राप्त होण्यास मदत होते.शिवकृपा प्राप्त होऊ शकते.

**अध्याय ९** भस्म लावावे. ॐ नमः शिवाय चा रोज सायंकाळी १२१ वेळा जप करावा. त्यानंतर हा अध्याय वाचावा. यामुळे पुर्वजन्मीचे स्मरण होण्यास मदत होते. हातुन अनेक प्रकारची सत्कर्मे घडु लागतात.

**अध्याय १०** या अध्यायाचे नित्याने पठण केले, तर संतानाची प्राप्ती होऊ शकते. अनेक साधु-संतांची भेट होऊ शकते.

**अध्याय ११** भस्म व रुद्राक्ष धारण करुन या अध्यायाचे वाचन करावे. याबरोबर कमीत- कमी ११ वेळा ॐ नमः शिवाय चा जप करावा.आपले दुर्भाग्य नष्ट होऊन वैभवाची प्राप्ती होईल.

**अध्याय १२** या अध्यायाच्या पठणाने मनातील पापी वासना नाहीशा होतील. व्यसन, रोग, दारिद्र ही नष्ट होऊ शकेल.

**अध्याय १३** या अध्यायाच्या पठणाने आपली आसुरी वृत्ती नाहीशी होऊन अंत:करणात शिव व विष्णु यांची भक्ती निर्माण होऊ शकेल.

**अध्याय १४** या अध्यायाच्या वाचनाने घरामध्ये शांती प्रस्थापित होते. गृहस्थाश्रम धर्म उत्तम रीतीने पार पडेल. घरात आलेले सर्व अतिथी आनंदी बनतील.

**अध्याय १५** आपली धर्मश्रध्दा वाढेल. वेदान्त-ज्ञान प्राप्त होईल. सद्‌गुरुंची भेट होईल.

* * *

## श्री शिव स्तुती

कैलासराणा शिव चंद्रमौळी । फणींद्र माथां मुकुटीं झळाळी ।।
कारुण्यसिंधू भवदु:खहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१।।
रवींदु दावानल पुर्ण भाळीं । स्वतेज नेत्रीं तिमिरौघ जाळी ।।
ब्रह्मांडधीशा मदनांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२।।
जटाविभूती उटि चंदनाची । कपालमाला प्रीत गोमतीची ।।
पंचानना विश्वनिवांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।३।।
वैराग्ययोगी शिव शूलपाणी । सदा समाधी निजबोधवाणी ।।
उमानिवासा त्रिपुरांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।४।।
उदार मेरू पति शैलजेचा । श्री विश्वनाथ म्हणती सुरांचा ।।
दयानिधी जो गजचर्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।५।।
ब्रह्मादि वंदि अमरादिनाथ । भुजंगमाला धरि सोमकांत ।।
गंगा शिरीं दोष महा विदारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।६।।
कर्पूरगौरी गिरिजा विराजे । हळाहळें कंठ निळाचि साजे ।।
दारिद्रयदु:खे स्मरणें निवारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।७।।
स्मशानक्रीडा करितां सुखावे । तो देवचूडामणि कोण आहे ।।
उदासमूर्ती जटाभस्मधारीं । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।८।।
भूतादिनाथ अरि अंतकाचा । तो स्वामी माझा ध्वज शांभवाचा ।।
राजा महेश बहुबाहुधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।९।।
नंदी हराचा हर नंदिकेश । श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश ।।
सदाशिव व्यापक तापहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१०।।
भयानक भीम विक्राळ नग्न । लीलाविनोदें करिकामभग्न ।।
तोरुद्र विश्वंभर दक्षमारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।११।।
इच्छा हाराची जग हें विशाळ । पाळी रची तो करि ब्रह्मगोळ ।।
उमापती भैरव विघ्नहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१२।।





भागीरथी तीर सदा पवित्र । जेथें असे तारक ब्रह्ममंत्र ।।
विश्वेश विश्वंभर त्रिनेत्रधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१३।।
प्रयाग वेणी सकळा हराच्या । पादारविंदीं वाहाती हरीच्या ।।
मंदाकिनी मंगल मोक्षकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१४।।
कीर्ती हराची स्तुती बोलवेना । कैवल्यदाता मनुजां कळेना ।।
एकाग्रनाथ विष अंगिकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१५।।
सर्वांतरीं व्यापक जो नियंता । तो प्राणलिंगाजवळी महंता ।।
अंकी उमा ते गिरिरूपधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१६।।
सदातपस्वी असे कामधेनू । सदासतेज शशि कोटिभानू ।।
गौरीपती जो सदा भस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१७।।
कर्पूरगौर स्मरल्याविसांवा । चिंता हरी जो भजकां सदैवा ।।
अंती स्वहीत सुचना विचारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१८।।
विरामकाळीं विकळ शरीर । उदास चित्तीं न धरीच धीर ।।
चिंतामणी चिंतनें चित्तहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१९।।
सुखावसानें सकळें सुखांचीं । दु:खावसानें टळती जगाचीं ।।
देहावसानीं धरणी थरारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२०।।
अनुहतशब्ध गगनीं न माय । त्याचेनि नादें भव शून्य होय ।।
कथा निजांगे करुणा कुमारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२१।।
शांति स्वलीला वदनीं विलासे । ब्रह्मांडगोळीं असुनी न दीसे ।।
भिल्ली भवानी शिव ब्रह्मचारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२२।।
पीतांबरे मंडित नाभि ज्याची । शोभा जडीत वरि किंकिणीची ।।
श्रीदेवदत्त दुरितांकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२३।।
जिवाशिवांची जडली समाधी । विटला प्रपंची तुटली उपाधी ।।
शुद्धस्वरें गर्जति वेद चारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२४।।

निधानकुंभ भरला अभंग । पाहा निजांगे शिव ज्योतिलिंग ।।
गंभीर धीर सुरचक्रधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२५।।
मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वाहा शंकरासी ।।
काशीपुरींभैरव विश्वतारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२६।।
जाईजुईचंपक पुष्पजाती । शोभे गळां मालतिमाळ हातीं ।।
प्रतापसुर्य शरचापधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२७।।
अलक्ष्यमुद्रा श्रवणीं प्रकाशे । संपुर्ण शोभा वदनीं विकासे ।।
नेईं सुपंथें भवपैलतीरीं । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२८।।
नागेशनामा सकळां जिव्हाळा । मना जपें रे शिवमंत्रमाळा ।।
पंचाक्षरी ध्यान गुहाविहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२९।।
एकांतिं ये रे गुरुराजस्वामी । चैतन्यरुपीं शिव सौख्यनामीं ।।
शिणलों दयाळा बहुसाल भारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।३०।।
शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको ।
योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको
काळाचें भय मानसीं धरुं नको दुष्टांसि शंकूं नको ।
ज्याचीया स्मरणे पतीत तरती तो शंभु सोडूं नको ।।३१।।

***





## श्री कालभैरवाष्टक स्तोत्र

ॐ देवराजसेव्यामानपावनांध्रि पंकजं । व्यालयज्ञ सूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम् ।।
नारदादियोगी वृन्दवन्दितं दिगंबरम् । काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।१।।
भानुकोटीभास्वरं भवाब्धितारकं परं । नीलकंठमिप्सितार्थदायकं त्रिलोचनम् ।।
कालकालमम्बुजाक्षमक्षशूलमक्षरं । काशिनापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।२।।
शूलटंकपाशदण्डपाणिमादिकारणं । श्यामकायमादिदेवमक्षरं निरामय् ।।
भीमविक्रमं प्रभुं विचित्रताण्डवप्रियं । काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।३।।
भुक्तिमुक्तिदायकं प्रशस्तचारुविग्रहं । भक्तवत्सलं स्थितं समस्तलोकविग्रहम् ।।
विनिक्वणन्मनोज्ञहेमाकिंकिणीलसत्कटिं । काशिकापुराधिनाय कालभैरवं भजे ।।४।।
धर्मसेतुपालकं अधर्ममार्गनाशकं । कर्मपाशमोचकं सुशर्मदायकं  विभुम् ।।
स्वर्णवर्णशेषपाशशेभितांगमण्डलमं । काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।५।।
रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं । नित्यमद्वितियमिष्टदैवतं निरंजम् ।।
मृत्युदर्पनाशनं करालदंष्ट्रमोक्षणं । काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।६।।
अट्टहासभिन्नपद्मजाण्डकोशसंतर्ति । दृष्टपातनष्टपापजालमुग्रशासनम् ।।
अष्टसिद्धिदायकं कपालमालिकन्धरं । काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।७।।
भूतसंघनायकं विशालकिर्तिदायकं । काशिकावासलोकपुण्यपापशोधकं विभुम् ।।
नीतिमार्गकोविदं पुरातनं जगत्पतिं । काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।८।।
कालभैरवाष्टकं पठन्ति ये मनोहरं । ज्ञानमुक्तिसाधनं विचित्रपुण्यवर्धनं ।।
शोकमोहदैन्यलोभ कोपतापनाशनं । ते प्रयान्ति कालभैरवांध्रिसंन्निधिं ध्रुवम् ।।९।।
इति श्रीमत शंकराचार्यविरचितं कालभैरवाष्टकं संपुर्णम् ।।

## १२ ज्योतिर्लिंग व त्यांचे धार्मिक माहत्म्ये -

भारतात शंकराची एकुण १२ महत्वाची मंदिरे आहेत. त्यांना आपण १२ (द्वादश) ज्योतिर्लिंग म्हणतो. धर्मशास्त्राने या ज्योतिर्लिंगांचा क्रम सांगितला आहे. त्या क्रमाने सर्व ज्योतिर्लिंगाची धार्मिक माहिती पुढील प्रमाणे –

**१) श्री क्षेत्र सोमनाथ (गुजरात, वेरावळ) :-**

सोमनाथ येथील हे शिव मंदिर एक महत्वपुर्ण मंदिर असुन १२ ज्योतिर्लिंगा पैकी १ महत्वाचे ज्योतिर्लिंग आहे. गुजरात राज्यातील सौराष्ट्र जिल्ह्यातील वेरावळ बंदर या ठिकाणी हे ज्योर्तिलिंग स्थापित असुन हे मंदिर चंद्र देवाने स्थापन केले आहे. याचा उल्लेख ऋगवेदामध्ये केला आहे. सर्व ज्योतिर्लिंगातुन सोमनाथ येथील ज्योतिर्लिंगाचे महत्वपुर्ण स्थान आहे. सोमनाथ मंदीर हे भारतातील सर्वात प्रसिध्द व धार्मिक स्थळ आहे. येथील मंदिराच्या प्रांगणात दररोज रात्री साडेसात ते साडे आठ या एक तासासाठी साऊंड एंड लाईट शो चालतो. या द्वारे सोमनाथ मंदिराच्या इतिहासाचे सचित्र वर्णन भाविकांसमोर सादर केले जाते. या ठिकाणीच श्रीकृष्णाने देहत्याग करुन आपला अवतार संपविला आहे. यामुळेच या क्षेत्रास अनन्य साधारण असे महत्व प्राप्त झालेले आहे.

श्री सोमनाथ हे ज्योतिर्लिंग गुजरात राज्यातील सौराष्ट जिल्ह्यातील वेरावळ बंदर येथे स्थापन केले असुन हे ठिकाण नाशिक शहरापासुन ८१६ कि.मी. अंतरावर आहे.

**२) श्री क्षेत्र शैल्यं मल्लीकार्जुन (आंध्रप्रदेश, श्री शैल्यं):-**

शिवपुराणात उल्लेख केल्याप्रमाणे हे स्थान पवित्र असल्याचे मानले जाते. देशातील १८ महाशक्ती स्थाना पैकी एक, वीरशैव सांप्रदायाच्या ५ प्रमुख मठांपैकी हे एक आहे. आर्य, द्रविड, शैव यांच्यात या पवित्र स्थानी एकता झाली. इ.स. १४०४ मध्ये विजयनगरच्या राजाने या मंदिराच्या मुख्य सभामंडपाची निर्मिती केली याच ठिकाणी श्रीकृष्ण, देवराय, हरिहर व ब्रह्मानंद्राय यांनी ३ गोपुरे बांधली.





<u>मंदिराची रचना –</u> कृष्णा नदिच्या दक्षिण किनारी नलामसाई जंगलात, २८०० फुट उंचीच्या पर्वतावर हे मंदिर आहे. या मंदिराची निर्मिती ८ व्या शतकात झाली. मंदिराची तटबंदी २५ फुट उंच आहे. या ठिकाणी मुळ शिवलिंगावर, छोटे–छोटे १००० शिवलिंग कोरले आहे. या खेरीज मल्लीकार्जुन, पार्वती, रावण, नंदी, कैलास पर्वत यांच्या चांदीच्या मुर्ती येथे आहे. प्रत्येक भिंतीवर शिल्पाकृती आहे.येथिल महाशिवरात्रीची यात्रा व रथउत्सव विशेष प्रसिध्द आहे.

हे जोतिर्लिंग नाशिक पासुन ९७० कि.मी.अंतरावर हैद्राबाद जवळ आहे.

**३) श्री क्षेत्र महाकालेश्वर (मध्यप्रदेश, उज्जैन):-**

अनेक प्राचीन धर्मग्रंथात व पुराणात या ज्योतिर्लिंगाचे सबंध आढळतात, देवलोकीच्या शिल्पकार विश्वकर्माने हे मंदिर बांधले आहे. इ.स. १२३५ मध्ये दिल्लीच्या बादशाहने या मंदिरावर हल्ला केला. यानंतर सुमारे ५०० वर्षांनी मराठ्यांनी या मंदिरावर कब्जा मिळवुन पुन्हा मंदिराची पुर्ण निर्मिती केली.

<u>मंदिराची रचना –</u> तलावाकाठी असलेल्या या मंदिराचे स्थान दक्षिणाभिमुख असुन शालीग्रामच्या शिवलिंगावर चांदीचे कवच चढवले आहे.

उत्सव – महाशिवरात्री, विजयादशमीस मोठा उत्सव भरतो, माघ कृष्ण षष्टी पासुन चतुर्दशीपर्यंत मोठा उत्सव साजरा होतो, प्रदोशानंतरच्या पुजा या ठिकाणी महत्वाच्या मानल्या जातात. पंचामृतपुजा, धान्यपूजा, पुष्पपुजा पाहण्यासाठी भाविकांची या ठिकाणी चांगलीच तारंबळ उडते.

श्री महाकालेश्वर हे पवित्र ठिकाण मध्यप्रदेश राज्यात असुन, नाशिक पासुन ४५५ कि.मी. अंतरावर आहे.

**४) श्री क्षेत्र ओंकारेश्वर तथा ममलेश्वर (मध्यप्रदेश, ओंकारेश्वर) :-**

श्री ओंकारेश्वर क्षेत्रात खुप पुर्वी आदिवासींची वस्ती होती. त्यांच्यात बळी देण्याची प्रथा होती. त्यामुळे भाविक या ठिकाणी क्वचित येत असत. दरीयाइ नावाच्या महान पुरुषाने ही प्रथा प्रथम बंद करण्याचा प्रयत्न केला. यानंतर या ठिकाणी उत्सव होऊ लागले. इ.स. ११९५ मध्ये राजा भारत सिहांने आदिवासींचा पराभव केला. या नंतर मात्र मराठ्यांच्या कारकिर्दीत या मंदिराची निर्मिती नव्याने झाली. काही कालावधी उलटल्यानंतर अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा मोठ्या प्रमाणावर सुधारणा केली. त्यांच्या काळातच कोठीलीम्नार्चान प्रथा सुरु झाली. या ठिकाणी महाशिवरात्री, कार्तिक पौर्णिमेस उत्सव, श्रावण सोमवार पुजा अभिषेक केला जातो. हे पवित्र ठिकाण मध्यप्रदेश राज्यात येत असुन नाशिक पासुन ६३० कि.मी. अंतरावर आहे.

**५) श्री क्षेत्र परळी वैजनाथ (महाराष्ट्र, परळी) :-**

श्री परळी वैजनाथ क्षेत्र हे अति प्राचीन मानले जाते. इ.स. ११८६ चा एक शिलालेख मंदिरात आहे. १२ व्या शतकातच येथे घाट बांधले गेले. इ.स. १७०६ मध्ये अहिल्याबाई होळकरांनी मंदिराचा जिर्णोध्दार केला. त्या संबंधी संस्कृत शिलालेख या मंदिरात आजही उपलब्ध आहे. पुढे या मंदिराची धुरा पेशव्यांनी सांभाळली. ब्रह्मा, वेणु, सरस्वती, नद्यांच्या त्रिवेणी संगम या ठिकाणी बघावयास मिळतो.

<u>मंदिराची रचना –</u> परळी गावाच्या एका निवांत अशा ठिकाणी छोट्याश्या टेकडीवर हे मंदिर वसले असुन हेमाडपंथी शैलीतील मंदिर चीरेबंधी, ३ घाट, दगडी दीपमाळ, सभामंडप, ३ गर्भगृह व दोन नंदि समावेत वसलेले आहे. याच शिखरावर प्राणी देवदेवतांची शिल्पे, व बाहेरील बाजुस ११ छोटी शिवमंदिरे आहेत. या ठिकाणी महाशिवरात्री, दसरा, श्रावणात दर सोमवारी शिवपालखीची मिरवणुक काढली जाते. या ठिकाणी महादेवास बेल व विष्णुस तुळस वाहीली जाते.परळी वैद्यनाथ हे पवित्र ठिकाण महाराष्ट्र राज्यात असुन बीड जिल्ह्यात आहे. नाशिक पासुन हे अंतर ३६१ कि.मी. आहे.





**६) श्री क्षेत्र भिमाशंकर (महाराष्ट्र, भिमाशंकर):-**

स्कन्दपुराण व शिवपुराणात या क्षेत्राचा उल्लेख आला आहे. श्री भिमाशंकर हे पवित्र ठिकाण समुद्रसपाटीपासुन ३४५४ फुट उंचीवर असुन हेमाडपंथी शैलीतील हे मंदिर ७ व्या शतकात बांधले गेले आहे. इ.स. १२०० मध्ये विनायक सावरकरांनी या मंदिराचा जिर्णोध्दार केला असुन रघुनाथ पेशव्यांच्या काळात या ठिकाणी विहीरीचे काम झालेले आहे. औरंगजेबाचा पराभव करण्यासाठी या भागातील सावंत बंधुनी घनदाट जंगलाचा फायदा घेवुन औरंगजबाचा पराभव केला असल्याची माहीती इतिहासात आहे.

<u>मंदिराची रचना–</u> सह्याद्री पर्वतातील, देवराई जंगलातील दरीत हे मंदिर वसलेले असुन सुमारे १०० पायऱ्या उतरुन या मंदिरात खाली जावे लागते. या मंदिराच्या शैलीची रचना इंडो आर्यन शैलीतील आहे. त्यामुळेच मुख्य शिखरावर छोटे–छोटे शिखर जोडलेले आढळतात. येथे असणारा नंदि मंडप प्राचीन काळातील मानतात. या मंदिरात ११ सुंदर कमानी व नव्या रचनांचा मेळ सुंदररित्या घातला आहे. या ठिकाणी महाशिवरात्रीला भव्य यात्रा भरते, सोमवती अमावस्या, कार्तिक पौर्णिमेस उत्सव होतो. दर सोमवारी भाविकांची मांदियाळी या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होत असते.

श्री भिमाशंकर हे पवित्र ठिकाण नाशिक येथुन १९० कि.मी. अंतरावर आहे.

**७) श्री क्षेत्र रामेश्वर (तामिळनाडु, रामेश्वर):-**

स्कन्दपुराण व शिवपुराणात या पवित्र क्षेत्राचा उल्लेख आलेला आहे. रामेश्वरद्विपाचा आकार काहीसा श्री विष्णुच्या शंखासारखा असुन श्रीलंकेच्या राजाने या ठिकाणी मंदिर बांधले होते. श्री रामेश्वर मंदिराची निर्मिती १२ ते १६ व्या शतकात झाली आहे. इ.स. १८९७ मध्ये स्वामी विवेकानंद येथे दर्शनार्थ येऊन गेलेले आहे.

<u>मंदिराची रचना –</u> श्री क्षेत्र रामेश्वर हे बंगालचा उपसागर व हिंदी महासागर यांचे संगम स्थान असुन द्रविड स्थापत्य शैलीचे हे मंदिर मानले जात आहे आहे.

येथील मंडपाची निर्मिती इ.स. १७४० ते १७७० या कालावधीत झाली आहे. या मंदिर परिसरात २२ विहीरी असुन गर्भगृहात चांदीच्या चौथऱ्यावर सुंदर शिवलिंग आहे. विशेष म्हणजे या शिवलिंगावर केवळ गंगाजलाचाच अभिषेक केला जातो. या ठिकाणी महाशिवरात्रीस मुख्य उत्सव होतो. हत्तीवरुन श्री रामेश्वर पालखीची मिरवणुक काढतात. दिपोत्सव साजरा केला जातो. या ठिकाणी तामिळ भाविक मोठ्याप्रमाणावर यात्रेसाठी येत असतात. सदर यात्रा १५ दिवस चालते. हे पवित्र ठिकाण नाशिकपासुन १९५० कि.मी. अंतरावर तामिळनाडु राज्यात आहे.

**८) श्री क्षेत्र औंढा नागनाथ (महाराष्ट्र, हिंगोली ):-**

पंडु पुत्र युधिष्ठीर या धर्मराजाने हे मंदिर बांधले आहे. महाराष्ट्रातील श्री संत नामदेव व त्यांचे गुरु श्री विसोबा खेचर यांनी प्रथम भेट या मंदिराला दिली. यानंतर अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा जिर्णोध्दार केला आहे.

मंदिराची रचना – या मंदिरात २५ फुट उंचीची तटबंदी असुन चार दिशास चार दरवाजे आहेत. मंदिराचा खालचा भाग काळ्या पाषाणात व वरील अर्धा भाग विटांवर पांढऱ्या रंगातील असल्याने मंदिर खुलुन दिसते महाद्वारावर शिवलीला प्रसंग आहेत. यात नटराज मुर्ती, शंकर पार्वतीस काही तरी समजावून सांगत असल्याचे विलभोणीय दृश्य बघावयास मिळते. याठिकाणी महाशिवरात्रीस मोठा उत्सव होतो तसेच रथउत्सव साजरा होतो. रथाच्या ५ फेऱ्या या मंदिराभोवती केल्या जातात. असे म्हटले जाते की, काशीची गंगा येथे प्रकट होते व कुंडाचे पाणी स्वच्छ करुन टाकते. विजयादशमीच्या दिवशी नागनाथ महाराजांची पालखी निघते.

हे पवित्र ठिकाण नाशिक पासुन ४३५ कि.मी. अंतरावर आहे.

**९)श्री क्षेत्र काशी विश्वेश्वर (उत्तरप्रदेश, वाराणसी ):-**

श्री क्षेत्र काशि हे सर्वात प्राचीन स्थान आहे. सप्तपुरांपैकी १ ते ५१ शक्तीपीठापैकी हे एक आहे. काशीवर मुस्लीम आक्रमणे अनेकदा झाली. इ.स. १०३३ मध्ये गजनीच्या महमदाने काशी लुटली होती. तुलसीदासानी रामचरित्र मानस ग्रंथरचना याच काशीत केली. संत एकनाथांनी एकनाथी भागवत व रुख्मिणी स्वयंवर या ग्रंथाचे लेखन याच पवित्र ठिकाणी केले.



श्री शिवनिका संस्थान, मिरगांव ता.सिन्नर.

म्हणुनच काशीचे महत्व अनन्य साधारण असे आहे.

मंदिराची रचना – मुळ मंदिराचे क्षेत्रफळ ५०० चौरस फुट इतके मर्यादित असुन १०–१० फुट क्षेत्रफळाचे दोन गर्भगृह व दोन सभामंडप व याच ठिकाणी मोठे–मोठे वाडे, घरे असल्यामुळे मंदिर परिसर पुर्णत: झाकला गेला आहे. या ठिकाणी महाशिवरात्री व त्रिपुरी पौर्णिमेस उत्सव होतात.

श्री काशिविश्वेश्वर हे पवित्र ठिकाण उत्तरप्रदेश राज्यात वाराणसी जिल्ह्याचे ठिकाणी वसलेले असुन नाशिक येथुन १३५० कि.मी. अंतरावर आहे.

**१०) श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र, त्र्यंबकेश्वर) :-**

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर हे स्थान प्राचीन आहे. सुमारे २०० वर्षापुर्वी यास श्रीपुर व ब्रह्मगिरीस श्रीगड म्हटले जात असे. सातवाहन काळात ठाकुर जातीपैंकी शीद राजघराण्याच्या ऐतिहासिक ताम्रपटात हा उल्लेख आढळतो. या ठिकाणी यादवांचे राज्य इ.स. १२७१ ते इ.स. १३०८ पर्यंत होते. इ.स. १८१८ मध्ये ब्रिटीशांचा अंमल या ठिकाणी सुरु झाला.

मंदिर रचना – मंदिराच्या चार बाजुस दगडी तटबंदी व चार दरवाजे आहे. हे मंदिर ५ दलांचे आहे. प्रवेश करताच नंदिदर्शन होते. येथे घागरीसारख्या आकारात ब्रह्मा, विष्णु, महेश, अशा तीन मुर्ती असुन त्यांच्यावरील तीन छीद्राना गंगा, गोदावरी, सरस्वती, नद्यांचे रुप मानले जाते. त्यातुन शिवलिंगावर अभिषेक होतो. या ठिकाणी महाशिवरात्रीस मोठा उत्सव साजरा होतो. सालाबादप्रमाणे वार्षिक रथोत्सव साजरा होऊन श्री शंकराचा सोन्याचा मुखवटा पालखीची गावातुन मिरवणुक निघते. तसेच दर बारा वर्षांनी येथे कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हे पवित्र ठिकाण नाशिक शहरापासुन २८ कि.मी. अंतरावर आहे.

**११)श्री क्षेत्र केदारनाथ (केदारनाथ, उत्तरांचल) :-**

श्री क्षेत्र केदारनाथ परिसरास देवभुमी असे म्हटले जाते. चारधामपैकी हे एक धाम आहे. या ठिकाणी रेड्याची पाठ जेथे जमिनीबाहेर राहिली. त्या ठिकाणी पंडु पुत्रांनी मंदिर बांधले आहे. या मंदिराचे पुर्ननिर्माण काम ८ व्या शतकात शंकराचार्यांनी केले. मुख्य मंदिराची निर्मिती ९ व्या शतकात झाली. तर अहिल्याबाई होळकर यांनी मंदिराचा जिर्णोध्दार केला. समुद्रसपाटीपासुन बारा हजार फुट उंचीवर हे मंदिर वसलेले आहे.

मंदिराची माहीती – बर्फाच्छादित पर्वतामधील एका उंच दगडी चौथऱ्यावर करड्या दगडी रंगाचे मंदिर असुन चार दिशांना चार दरवाजे आहे. येथुन हिमालयातील नंदादेवी, नंदाघुमटी त्रिशुली, हत्तीपर्वत हि शिखरे दिसतात.

या ठिकाणी महाशिवरात्रीस उत्सव साजरा होतो. शिवरथाची मिरवणुक निघुन रथाच्या पाच फेऱ्या काढल्या जातात.

हे मंदिर उत्तरांचल राज्यात असुन येथे ठिकाण नाशिक येथुन २११० कि.मी. अंतरावर आहे.

**१२)श्री क्षेत्र घृष्णेश्वर (महाराष्ट्र - औरंगाबाद):-**

स्कन्दपुराणानुसार व शिवपुराणात, रामायणात व महाभारतात श्री घृष्णेश्वराचा उल्लेख आला आहे. सुमारे १५०० वर्षापासुन राष्ट्रकुट घराण्यातील राजा कृष्णराजाने हे मंदिर बांधले आहे. इ.स. १७३० मध्ये गौतमीबाई होळकर यांनी मंदिराचा जिर्णोध्दार केला.

मंदिराची माहिती – मंदिराचे मुळ नांव कुंकूमेश्वर होते. हे मंदिर शिल्पकलेचा उत्तम नमुना होय. मुळ दगडी चौथरा सहा हजार आठशे चार चौरस फुट असुन अर्धे मंदिर हे लाल पाषाणाचे आहे. मंदिरात सुंदर नंदीची मूर्ती असुन खांबावर रामायण व महाभारत दशावतार आदिंचे चित्रे रेखाटले आहे. इ.स. १७९१ मध्ये अहिल्याबाई होळकरांनी एक एकर बागेत शिवालय तिर्थ बांधले आहे.

या ठिकाणी महाशिवरात्रीस मोठा उत्सव साजरा होतो. श्री शंकराची पलखी शिवालय तिर्थावर स्नानासाठी आणली जाते. रात्रीच्यावेळी अलंकार पुजेचा सोहळा होतो. श्रावण सोमवारी मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनासाठी येतात. हे ठिकाण औरंगाबाद (महाराष्ट्र) जिल्ह्यात असुन नाशिकपासुन २६५ कि.मी. अंतरावर आहे.



श्री शिवनिका संस्थान, मिरगांव ता.सिन्नर.

## देवाधिदेव महादेव श्री शिवशंभु व पार्वती देवी यांचे निवासस्थान म्हणजेच कैलास पर्वत....

**कैलास पर्वत व मान सरोवराचे महात्म्ये :-**

देवाधिदेव महादेव श्री शिवशंभू आणि जगनमाता पार्वती देवी यांचे पवित्र निवास स्थान म्हणजे कैलास पर्वत. जगामध्ये अस्तित्वात असलेल्या निरनिराळ्या धार्मिक पवित्रस्थळांमध्ये कैलास पर्वत आणि त्याच्या नजिकच पसरलेले मानस सरोवर ही दोन तीर्थ क्षेत्रे हिंदुस्तानात सर्वाधिक महत्वाची, मोठी आणि प्रथम क्रमांकाची मानली गेली आहेत. शिवपुराणामध्ये असा उल्लेख आहे की कैलास पर्वत दर्शन आणि मानसरोवर स्नान ज्याला नशिबाने प्राप्त झाले त्या व्यक्तिच्या सात पिढ्यांचा उध्दार होतो. परंतु एक मात्र सत्य आहे, की कैलास दर्शन हा जीवनामधील अत्यंत रोमांचकारी, दुर्मिळ आणि कृतकृत्य वाटणारा अनुभवी प्रसंग आहे. सारे जीवन यथार्थ झाल्याचे मानसिक समाधान येथे जाण्याने मिळते. नास्तिक देखील त्या सत्य शिव आणि सुंदर यांचे प्रतिक दिसणाऱ्या कैलास पर्वताच्या दर्शनाने नतमस्तक झाल्याशिवाय राहत नाही. प्रत्येक भाविक तर कैलास दर्शन घेतांना आनंदाच्या अश्रुनींच त्या शिव परमात्म्याला अभिषेक करतांना दिसतात. त्यांचे हृदय भक्तीभावाने उंचबळुन येते. कुलस्वामिनी अथवा कुलदेवता यांची कृपादृष्टी आणि वडीलधाऱ्या मंडळींचा आशिर्वाद यांच्यामुळे कैलास–मानससरोवर यात्रा हि निर्विघ्न पार पडते. सनातन धर्मी, बौध्द धर्मी, निरनिराळ्या धर्माचे अनुयायी ही यात्रा करतांना स्वत:ला धन्य समजतात. जगामधील सर्व तीर्थयात्रांमध्ये सर्वाधिक दुर्गम , अत्यंत कठीण आणि म्हणुन साहसी असे हे तीर्थक्षेत्र आहे. परंतु त्याचबरोबर सर्वाधिक पवित्र व मंगलमय आनंदी असल्यामुळे भाविक सारे कष्ट सहन करुन तो परमानंद मिळवतात.

कोणत्याही तिर्थक्षेत्राचे स्थान म्हणताच डोळ्यापुढे उभे राहतात ते मंदीर आणि त्यामधील निरनिराळ्या देवतांच्या मुर्ती, मंदिराचे उंच कळस, डोंगरावर उभी असलेली भव्य कलाकृती, पुजा, अर्चा, पुजाऱ्यांची धावपळ, आरत्या, शंख–घंटेचा निनाद, फुले, पुजा साहीत्य, यांची दुकाने, आणि भाविकांची वर्दळ.

मात्र ह्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वरील कोणत्याच गोष्टी दिसुन येत नाही. नाही तेथे मुर्ती, ना मंदिर, ना पुजा-अर्चा, ना भाविकांची वर्दळ. एक अति उंच गोलाकार बर्फाच्छादित असा पर्वत आहे. हिमालयाच्या पर्वताचाच एक भाग कैलास पर्वत आहे. दुरवरुन बघतांना एक अवाढव्य अशी शिवलिंगाकार आकृती भासते. भस्माचे पट्टे आणि ध्यानमुर्ती शिवप्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. शिव-पार्वतीचे असे हे पवित्र निवासस्थान आणि त्या कैलास पर्वतानजिकच पसरलेले एक प्रचंड सरोवर मान-सरोवर म्हणुन प्रसिध्द आहे.

कैलास पर्वत शिखराची उंची समुद्रसपाटीपासुन १९ हजार फुट असुन, मान-सरोवराचा परिघ ९० किलोमीटर इतका लांब आहे. तिबेटच्या हद्दीत असलेल्या या कैलास पर्वतावर आज तरी राजकीय हक्क चीन या देशाचाच आहे. मान-सरोवराच्या उत्तरेस कैलास पर्वत आहे.

कैलास पर्वत हा सदैव बर्फाच्छादीत असतो. कैलास पर्वत हा इतर सर्व परिसरांवर लहान मोठे दगड माती रेती असुन तिथे एक देखील मोठे झाड कुठेच दिसुन येत नाही. सारे काही बोडखे वाटते. गवत आणि लहान-लहान झुडपी मात्र सर्वत्र दिसुन येतात. अतिशय थंडी, वारा, पाऊस, हिम बर्फाचा वर्षाव, बर्फावरुन परावर्तीत झालेली सुर्याची प्रकाश किरणे डोळ्यास झगझगाट निर्माण करतात. सर्व वातावरण सदैव बदलत राहणारे असते. हे सारे असुन देखील प्रत्येक रात्री भक्तीभावाने त्या शिव परमात्म्याच्या अत्यंत पवित्र अशा निवासस्थानाचे दर्शन घेण्यास अती उत्सुकता जाणवते.

जीवनातील सर्वोत्तम पवित्र तीर्थक्षेत्र कैलास मान-सरोवराचे पृथ्वीवर जन्म घेणाऱ्या प्रत्येक हिंदू व्यक्तिने किंवा त्याच्या कुटुंबातील एका तरी व्यक्तिने किमान एकदा तरी दर्शन घेतले पाहीजे ज्यामुळे त्याच्या अलौकीक शक्तिचा विकास होईल. मानसिक शांती समाधानाचा परमोच्च अनुभव मिळेल. जगामधील सर्व तीर्थ क्षेत्रांमध्ये सर्वाधिक दुर्गम, अत्यंत कठीण आणि म्हणुन साहसी असे हे तीर्थक्षेत्र आहे. परंतु त्याचबरोबर सर्वाधिक पवित्र व मंगलमय आनंदी असल्यामुळे भाविक सारे कष्ट सहन करुन तो परमानंद मिळवतात.





कैलास पर्वताच्या पायथ्याजवळ दोन सरोवर आहे. एक म्हणजे पवित्र मान-सरोवर आणि दुसरे म्हणजे अशुभ राक्षस सरोवर ! एकीकडे मान-सरोवराचे पाणी गोड आहे. तर दुसरीकडे राक्षस सरोवराचे पाणी मात्र खारे आहे. आणि अजुन एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे या दोन्ही सरोवरांच्या मध्ये केवळ अगदी लहानसा भाग आहे. जो या सरोवरांना वेगळं करतो. असे म्हणतात की राक्षस सरोवर म्हणजे तेच सरोवर आहे जेथे रावणाने श्री भगवान शंकराची आराधना केली होती आणि वर मिळवला होता. स्थानिक लोक या दोन सरोवरांना देवांचे आणि राक्षसाचे प्रतिक मानतात. अजुन एक अद्भुत गोष्ट म्हणजे आकाशातुन पाहील्यास मानसरोवराचा आकार सुर्यासारखा दिसतो तर राक्षस सरोवराचा आकार मात्र चंद्रासारखा दिसतो. अजुन एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या पर्वताजवळील परिसरात जाणाऱ्या भाविकांना असा अनुभव येतो की, त्यांची नखे आणि केस भरभर वाढली आहेत. म्हणजेच सामान्य परिस्थितीत नखे आणि केस दोन आठवड्यात जेवढी वाढतात. तेवढीच वाढ कैलास पर्वताच्या वातावरणात अवघ्या दोन दिवसांमध्ये होते. या रहस्यावर आजही अनेक जाणकार संशोधन करत आहेत.

## दैनंदिन आरती

श्री सिध्द क्षेत्र श्री ईशान्येश्वर मंदिरात दररोज सकाळी ७:३० वाजता व सायंकाळी ७:३० वाजता नित्यनियमाने श्रीमान गणपती, श्रीमान देवीची व श्रीमान ईशान्येश्वर महादेवाची आरती होते. आरती नंतर, प्रार्थना, श्लोक, शिवध्यान, पंचाक्षर स्तुती, श्री ईशान्येश्वराष्टकम् ,मंत्र पुष्पांजली, क्षमा प्रार्थणा, जयघोषासह नियमित आरती भाविकांच्या उपस्थितीत केली जाते.

**(१) श्रीमान गणपतीची आरती**

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।१।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।। धृ ।।
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटि कुंकमकेशरा ।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरें चरणी घागरिया ।।२।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।। धृ ।।
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।।
दास रामाचा वाट पाहे सदना ।।
संकटी पावावे, निर्वाणी रक्षावें, सुरवरवंदना ।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।। धृ ।।





**(२) श्रीमान देवीची आरती**

दुर्गे-दुर्घट भारी तुजविण संसारी ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ।।
वारीं वारीं जन्ममरणांतें वारी ।
हारीं पडलों आतां संकट निवारी ।।१।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।।धृ।।
त्रिभुवनभुवनी पाहतां तुजऐसी नाहीं ।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही ।।
साही विवाद करितां पडिलें प्रवाही ।
ते तू भक्तांलागी पावसि लवलाही ।।२।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।।धृ।।

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशांपासुनि सोडीं तोंडी भवपाशा ।।
अंबे तुजवाचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लीन झाला पदपंकजलेशा ।।३।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।।धृ।।

* * *

## श्रीमान भगवान शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा । वीषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।।१।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओवाळुं तुज कर्पुरगौरा ।। धृ ।।
कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा । अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।।।२।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओवाळुं तुज कर्पुरगौरा ।। धृ ।।
देवीं दैत्यीं सागरमंथन पै केलें । त्यामाजी अवचित हालाहल जे उठिले ।
ते त्वां असुरपणें प्राशन केलें । नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले ।।३।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओवाळुं तुज कर्पुरगौरा ।। धृ ।।
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी । घुकुळटिळक रामदासा अंतरी ।।।४।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओवाळुं तुज कर्पुरगौरा ।। धृ ।।

## प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।।
प्रेमे आलिंगिन आनंदे पूजिन । भावे ओवाळिन म्हणे नामा ।।१।।
त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वंमम देव देव ।।२।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा ।
प्रकृतिस्वभावात् करोमि यद्दम् सकलं परस्मै,
नारायणायेति समर्पयामि ।।३।।
अच्युतं केशवं रामनारायणं, कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ।।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।५।।





## मंत्रपुष्पांजली

ओम यज्ञेन यज्ञमयजत देवास्तानिधर्माणि प्रथमान्यास् ।
तेहनाकं महिमानः सचंत यत्र पुर्वेसाध्या सतिदेवाः ।।
ओम राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वय वैश्रवणाय कुर्महे ।
समे कामान् कामकामाय महयं कामेश्वरोवैश्रमणो ददातु ।।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।
ओम स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वराज्य वैराज्यं पारमेष्ठं राज्य
महाराज्यमाधिपत्यमयं समतपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुष आतादापरार्धात् ।
पृथिव्यै समुद्रयपर्यताया एकराळिति ।
तपप्येषश्लोहोभिगीतोमरुतः परिवेष्टारोमरुत्तस्यावसन् गृहे ।।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

## श्लोक (दोन्ही आरती करीता)

नीलाम्बुंजश्यामलकोमलांग सीता समारोपित वाम भागम् ।
पाणौ महा सायक चारु चापं नमामि रामं रघुवंशनाथम् ।।
भवाब्धिपोतं भरताग्रजंतम् भक्ती प्रियं भानु कुला प्रदिप्तम् ।
भुतादिनाथम् भुवनाधिपत्यम् भजामि रामं भवरोग वैद्यम् ।।
लोकाधिनाथम् रणरंगधीरम् राजीव नेत्रम् रघुवंश नाथम् ।
कारुण्य रुपम् करुणा करंतम् श्री रामचंद्रम् शरणं प्रपद्दे ।।
सखेति मत्वा प्रसभं यदुक्तम् हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं अनंत वेदम् मया प्रमादात् प्रणयेन वापि ।।
त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देव देव ।।
शांताकारं भुजंग शयनं पद्मनाभं सुरेशम् ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्ण शुभाङ्गम् ।।
लक्ष्मीं कान्तं कमलनयनं, योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वन्दे विष्णु भव भय हरं सर्व लोकैकनाथम् ।।
अच्युतं केशवं राम नारायणं, कृष्ण दामोदरं वासुदेवम् हरिम् ।
श्री धरम् माधवं गोपिकावल्लभम्, जानकी नायकं श्री रामचन्द्रं भजे ।।

## देव स्तुती

विघ्नेश्वराय वरदाय सुरप्रियाय, लंम्बोदराय सकलाय जगद्धिताय
नागाननाय श्रुति यज्ञ विभुषिताय,गौरी सुताय गणनाथ नमोनमस्ते
नमो देव्यै महा देव्यै शिवायै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै,नियताः प्रणतास्मताम् ।।
सर्व मंगल माङ्गल्ये शिवे सर्वाथ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।
त्वं वैष्णवी शक्तिरनन्तवीर्या । विश्वस्य बीजं परमासि माया
सम्मोहितं देवि समस्त मेतत् । त्वं वै प्रसन्ना । भुवि मुक्ती हेतुः ।।
असितगिरि समंस्यात्कज्जलं सिन्धुपात्रे सुरतरुवरशाखा लेखनीपत्र मुर्बी ।
लिखति यदि ग्रहीत्वा शारदा सर्वकालं तदपि तव गुणानामीश पारं न याति
करचरण कृतं वा, कायजं कर्मजं वा, श्रवण नयनजं वा, मानसम् वा पराधम् ।
विहतं-विहतं वा, सर्व मेत् क्षमस्व, जै-जै करुणाब्धे श्री महादेव शंभो ।।

## पंचाक्षर स्तुती (रात्रीचे आरतीसाठी)

नागेंद्र हराय त्रिलोचनाय् भस्मांग रागाय् महेश्वराय ।
नित्याय शुध्दाय दिगंबराय् तस्मै नकाराय् नमः शिवाय ।।
मंदाकिनी सलील चंदन चर्चीताय् नंदीश्वर प्रमथनाथ महेश्वराय् ।
मंदार पुष्प बहु पुष्प सुपूजिताय तस्मै मकाराय् नमःशिवाय ।।
शिवाय गौरी बदनाब्ज वृंदम, सुर्याय् दक्षाध्वर नाशकाय् ।
श्री निलकंठाय वृषध्वजाय् तस्मै शिकाराय नमः शिवाय ।।
वसिष्ठ कुम्भोम्द्व गौतमार्यम् मुनीन्द्र देवार्चित शेखराय ।
चन्द्रार्क वैश्वनार त्रिलोचनाय तस्मै वकाराय नमः शिवाय ।।
यक्ष स्वरुपाय जटाधराय् पिनाक हस्ताय सनातनाय ।
दिव्याय् देवाय् दिगंबराय् तस्मै यकाराय् नमः शिवाय ।।
निरावलम्बस्य ममावम्बं विपाटिता शेष विपत्कदम्बम् ।
मदीय पापा चल पाप शभ्बं प्रवर्ततां वाचि सैदव बम् बम् ।
पापोहं पापकर्माहं पापात्मा पापसम्भवः।
त्राहि मां पार्वतीनाथ सर्व पाप हरो भव।
त्राहि माम् पापिनं घोरं, धर्माचार विवार्जिताम्,
नमस्कारेण देवेश संसारार्णव पातिनमः ।।



श्री शिवनिका संस्थान, मिरगांव ता.सिन्नर.

## श्री ईशान्येश्वराष्टकम् (सकाळची आरती करीता)

नमामीशमीशान निर्वाणरुपं विभुं व्यापकं ब्रम्हवेदस्वरुपं ।
निजंनिर्गुणं निर्विकल्पं निरीहं चिदाकाशमाकाशवासं भजेहं ।।
निराकार मोंकारमूलं तुरीयं गिराज्ञान गोतीत मीशं गिरीशं ।
करालं महाकाल कालं कृपालं, गुणागार संसार पारं नतो हं ।
तुषाराद्रिसंकाशगौरं गंभीर, मनोभूत कोटि प्रभाश्रीशरीरं ।
स्फुरन्मौलि कल्लोलिनी चारुगंगा,लसद्भालबालेंदु कंठे भुजंगा ।।
चलत्कुंडलं भ्रूसुनेत्रं विशालं प्रसन्नाननं नीलकंठ दयालं ।
भृगांधीशचर्मांबरं मुंडमालं प्रियशंकरं सर्वनाथं भजामि ।।
प्रचंड प्रकृष्टं प्रगल्भं परेशं अखंण्ड अजं भानु कोटि प्रकाशं ।
त्रयःशुलनिर्मूलनं शूलपाणिं भजेंहं भवानी पतिं भावगभ्यं ।।
कलातीत कल्याण कल्पांतकारी, सदा सज्जनानंद दाता पुरारी ।
चिदानंद संदोह मोहपहारी प्रसीद-प्रसीद प्रभो मन्मथारी ।
नयावद उमानाथ पादारविंदं भजंतीह लोके परेवानराणाम् ।।
नतावत्सुखं शांति संताप नाशं प्रसीद प्रभो सर्वभुताधिवासं ।
न जानामि योगं जपं नैव पूजां नतोहं सदा सर्वदा शंभु तुभ्यं ।
जराजन्म दुःखौघतातप्यमानं प्रभो पाहि आपन्न मामीश शंभो ।
ईशान्येश्वराष्टकं मिदं प्रोक्तं विप्रेण हर तोषये ।
ये पठंन्ति नराभक्त्या तेषां शंभुः प्रसीदति ।।
निरावलम्बस्य ममावम्बं विपाटिता शेष विपत्कदम्बम् ।
मदीय पापा चल पाप शभ्बं प्रवर्ततां वाचि सैदव बम् बम् ।
पापोहं पापकर्माहं पापात्मा पापसम्भवः।
त्राहि मां पार्वतीनाथ सर्व पाप हरो भव।
त्राहि माम् पापिनं घोरं, धर्माचार विवार्जिताम्,
नमस्कारेण देवेश संसारार्णव पातिनमः ।।

**जय घोष**

श्री ईशान्येश्वर महादेव की जय हो ।
धर्म की जय हो, धर्म की जय हो ।
अधर्म का नाश हो, अधर्म का नाश हो ।।
प्राणियों मे सद्भावना हो, प्राणियों मे सद्भावना हो ।
विश्व का कल्याण हो, विश्व का कल्याण हो ।।
श्री ईशान्येश्वर महादेव की जय हो ।
श्री ईशान्येश्वर महादेव की जय हो ।
श्री ईशान्येश्वर महादेव की जय हो ।

***





**मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासकामी,**
**आम्ही ऑनलाईन स्वरुपात देणगी स्विकारतो.**

**For RTGS -**

| | |
|---|---|
| **BANK NAME :** | THE SARSWAT CO-OP. BANK LTD., |
| **BRANCH :** | MUSALGAON |
| **A/C NAME :** | SHREE SHIVNIKA SANSTHAN, MIRGAON |
| **CURRENT A/C NO. :** | 208100100000251 |
| **IFSC CODE :** | SRCB0000208 |

**-: मंदिराच्या संपर्कासाठी व पत्रव्यवहारासाठी पत्ता :-**


श्री. आवारे नामकर्ण यशवंत,
सरचिटणीस
श्री शिवनिका संस्थान, मिरगांव
श्री सिध्दक्षेत्र श्री ईशान्येश्वर मंदिर व्यवस्थापन समिती
मु. मिरगांव पो. शहा
ता. सिन्नर जि. नाशिक. पीन - ४२२ १०४
मोबाईल नं. - ९८२२० ९४०९२
संकेतस्थळ- Web. www.shivnika.com ई-मेल- contact@shivnika.com


**- सौजन्य -**


**श्री. मधुकर संभाजी गांगुर्डे, विश्वस्त**
ज्यूपिटर इंग्लिश मिडीयम स्कुल, दिंडोरी.
श्री ईशान्येश्वर विद्या निकेतन, दिंडोरी.